वन जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
क्र.एफएलडी १०८९/प्र.क्र.७१/८९/फ-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १० मार्च,१९८९.

पहा:- शासन परिपत्रक क्र.एफएलडी १०८७/प्र.क्र.३९८/फ-३, दिनांक १४ जुलै, १९८७.

## परिपत्रक

अनुसूचित जमाती कल्याण समितीने धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यातील वनक्षेत्रातील अतिक्रमणे हटविण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा ऊहापोह करुन यापुढे वनजमिनीवर अवैध वस्त्या स्थापन होणार नाहीत याची दक्षता वन अधिकाऱ्यांनी वेळीच घ्यावी अशी शिफारस त्यांच्या ७ व्या अहवालामध्ये [१९८७-८८] केलेली आहे.

१. दिनांक १-४-१९७२ ते ३१-३-१९७८ या काळात वनजमिनीवर शेतीसाठी झालेली अतिक्रमणे काही मर्यादेपर्यंत नियमित करावीत असे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार शासनाने दिनांक २७-२-१९७८ व दिनांक १२-९-१९७९ च्या शासन आदेशान्वये सर्व संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत, याची सर्वांना कल्पना आहेच. तथापि, शासनाचे असेही धोरण आहे की, दिनांक ३१-३-१९७८ नंतर वनजमिनीवरील शेतीसाठी नव्याने झालेले वा होणारे अतिक्रमण वन अधिकाऱ्यांनी निग्रहपूर्वक दूर करावेत. यासंबंधात वर उल्लेखलेल्या दिनांक १४ जुलै, १९८७ च्या शासन परिपत्रकातील सूचनांकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

२. वन जमिनीवरील शेतीसाठी आणि वस्तीसाठी झालेली अतिक्रमणे अतिशय दक्षतेने वेळोवेळी हटविली गेल्यास शिरपूर येथील दुर्धर प्रसंग इतरत्र पुन्हा उद्भवणार नाही. या अनुषंगाने सर्व वन अधिकाऱ्यांना पुन्हा एकवार अशा सूचना देण्यात येतात की, दिनांक ३१-३-१९७८ नंतर वनजमिनीवरील नव्याने झालेली सर्व प्रकारची अतिक्रमणे त्यांनी निग्रहपूर्वक हटवावीत आणि अशी अतिक्रमणे पुन्हा होणार नाहीत याची सर्वांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
17 MAR 1989

[ श्री.टो.शिंत्रे ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रपत्र

विभाग :- महसूल व वन विभाग [फ-३]

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या सातव्या [१९८७-८८] अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीचे विवरण

| अहवालातील शिफारस | शासनाने केलेली कारवाई | कारवाई पूर्ण नसल्यास किंवा कारवाईस विलंब झाला असल्यास त्याची थोडक्यात कारणे |
|---|---|---|
| २. | ३. | ४. |
| वन विभागातील जबाबदार अधिका-यांच्या निष्काळजी-पणामुळे हा मोठा दुर्धर प्रसंग उद्भवलेला आहे. सबब यापुढे अशा अवैध वस्त्या स्थापन होणार नाहीत याची दक्षता वन अधिका-यांनी घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. | दिनांक ३१-३-१९७८ नंतर वनजमिनीवरील नव्याने झालेली अतिक्रमणे निग्रहपूर्वक हटवावीत आणि अशी अतिक्रमणे नव्याने होणार नाहीत याची कटाक्षाने दक्षता घेण्याबाबत सर्व वनाधिका-यांना दिनांक १०-३-१९८९ च्या परिपत्रकान्वये पुन्हा सूचना दिलेल्या आहेत. | —— |